जागतिक कृषि गणना या १०० टक्के केंद्र पुरस्कृत योजनेस सन २०१८-१९ करीता प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः कृगयो -२०१८/प्र.क्र.९४ /११-अे
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई-४०० ०३२.
तारीख: २३ मे, २०१८

वाचा -

१) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्र. पदसातत्य -२०१८/प्र.क्र.२५/११-अे, दि.१२.०३.२०१८
२) शासन परिपत्रक,वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/ अर्थ-३, दि.०२.०४.२०१८
३) भारत सरकार, कृषि मंत्रालय, कृषि व सहकार विभाग यांचे पत्र क्र. एफ ११०१४-२/२०१८-अेसीयू, दि.२६.०४.२०१८
४) कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र.कृआ/कृ.ग./अनुदान/प्रशा.मान्यता/प्रक्र २/२०६/२०१८, दि.१६.०५.२०१८

प्रस्तावना -

जागतिक कृषि गणना योजना या १०० टक्के केंद्र पुरस्कृत योजनेकरिता केंद्र शासनाने सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी महाराष्ट्र राज्याकरिता उपरोक्त दिनांक २६.०४.२०१८ च्या पत्रान्वये प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

२. जागतिक कृषि गणना योजना या १०० टक्के केंद्र पुरस्कृत योजनेतील १३ अस्थायी पदे दिनांक १ मार्च, २०१८ ते ३० सप्टेंबर, २०१८ पर्यंत चालू ठेवण्यास उपरोक्त दिनांक १२.०३.२०१८ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

३. जागतिक कृषि गणना योजना या १०० टक्के केंद्र पुरस्कृत योजनेस केंद्र शासनाने दिलेल्या प्रशासकिय मान्यतेच्या मर्यादेत व राज्य शासनाच्या सन २०१८-१९ मध्ये मंजूर केलेल्या तरतूदीनुसार राज्य शासनाची बाबनिहाय प्रशासकीय मान्यता देण्याकरिताचा प्रस्ताव कृषि आयुक्तालयाने उपरोक्त दि.१६.०५.२०१८ च्या पत्रान्वये सादर केलेला आहे. अनुषंगाने उपरोक्त योजनेकरीता सन २०१८-१९ या वर्षाकरीता प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय : -

जागतिक कृषि गणना योजना ही १०० टक्के केंद्र पुरस्कृत असून या योजनेकरिता सन २०१८-१९ साठी पुढील तक्त्यात दर्शविण्यात आल्यानुसार रु.२८०.५० लाख इतक्या रकमेस शासनाची प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	**बाब**	**सन २०१७-१८ राज्य शासनाची प्रशासकीय मान्यता (रक्कम रुपये लाखात)**
१	०१-वेतन	१५०.००
२	११-देशांतर्गत प्रवास खर्च	२.५०
३	१३-कार्यालयीन खर्च	२०.००
४	इतर खर्च	१००.००
५	१६-प्रकाशने	७.००
६	२४-पेट्रोल तेल वंगण	१. ००
एकूण		**२८०.५०**

२. प्रस्तुत खर्च खालील लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ करिता मंजूर केलेल्या अर्थसंकल्पीय तरतूदीतून भागविण्यात यावा -

मागणी क्र. डी-३
२४०१- पिक संवर्धन
१११- कृषि अर्थशास्त्र व सांख्यिकी
१०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना
(००)(१०) जागतिक कृषि गणना
(२४०१ ०९९६)

३. प्रस्तुत प्रयोजनार्थ सहाय्यक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे- ५ यांना आहरण व संवितरण अधिकारी तर कृषि संचालक, (विस्तार व प्रशिक्षण)यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. प्रस्तुत शासन निर्णय वित्त विभाग परिपत्रक क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/ अर्थ-३, दि.०२.०४.२०१८ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५२३१४४६३४३५०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Arun Vishnupant Joshi

Digitally signed by Arun Vishnupant Joshi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=25b1cd893dfd4dc594def1c4642465ecdafbdae899f879d9b4603fe37cfb3598, cn=Arun Vishnupant Joshi
Date: 2018.05.23 14:45:10 +05'30'

(अ.वि.जोशी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे (५ प्रती)
२. कृषि संचालक (वि.प्र.), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५
३. मुख्य सांख्यिक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५
४. सहाय्यक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५
५. सहाय्यक संचालक (अर्थसंकल्प), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५
६. महालेखापाल, (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
७. संचालक, लेखा व कोषागारे, नवीन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
८. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
९. वित्त विभाग (व्यय-१) / (अर्थसंकल्प-१३) / (अर्थोपाय), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
१०. नियोजन विभाग (कार्यासन-१४३१), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
११. अपर मुख्य सचिव (कृषि) यांचे स्वीय सहाय्यक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
१२. सहसचिव (११-अे) यांचे स्वीय सहाय्यक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
१३. कक्ष अधिकारी (२-अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
१४. निवड नस्ती, का.११-अे.